<u>-: प्रेस नोट :-</u>

**अवैधपणे चालणाऱ्या हुक्का पार्लर व तेथे हुक्का पिणाऱ्या व्यक्तींवर कारवाई केले बाबत.**

पुणे शहरामध्ये अनधिकृतपणे चालणाऱ्या हुक्का पार्लर आणि हुक्का पिणाऱ्यांबाबत तक्रारी प्राप्त झालेने काल दिनांक ०६/०८/२०१८ रोजी १८.०० वा. पासून ते रात्री ०२.०० वा. च्या दरम्यान शहरातील वेगवेगळ्या ठिकाणी गुन्हे विभागातील गुन्हे, आर्थिक व सायबर तसेच अंमली पदार्थ विरोधी पथकातील अधिकारी व कर्मचाऱ्यांमार्फत गुन्हे शाखेचे अपर पोलीस आयुक्त श्री. प्रदिप देशपांडे, नव्यानेच गुन्हे शाखेत कार्यभार स्विकारलेल्या पोलीस उप आयुक्त श्रीमती ज्योतीप्रिया सिंग व पोलीस उप आयुक्त श्री. शिरीष सरदेशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली संयुक्तरित्या कोंढवा, मुंढवा, कोरेगांवपार्क, डेक्कन, हिंजवडी इ. पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये कार्निवल, शिशा, मल्ली बु कॅफे, होली-स्मोक, हुक मी-अप, कॅस्नोव्हा, द व्हिलेज या ठिकाणी सहायक पोलीस आयुक्त श्री. निलेश मोरे व श्री. भानुप्रताप बर्गे यांच्या पथकांव्दारे कारवाई करुन हुक्का विकणारे ०७ हॉटेल्स तसेच ५५ हुक्का पिणाऱ्यांवर COTPA कायद्या अंतर्गत कारवाई करण्यात आलेली आहे. या पुढे देखील अशा प्रकारची कारवाई करण्यात येणार आहे.